# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २०/०४/२०२२ (बुधवार)

---

## कोळसा चोरी करणा—या विरूध्द गुन्हा नोदं

**पोलीस स्टेशन कन्हान** — अंतर्गत फुकट शिवार कन्हान झोपडपट्‌टी ४ किमी पश्चिम. दिनांक १८.०४.२२ चे २०.०० ते २१.३० वा दरम्यान यातील **आरोपी नामे— फारूख शेख वय ४० वर्ष रा फुकट नगर, कन्हान** याने बस चे डेपो मधुन अवैधरीत्या १० टन कोळसा कि **अंदाजे ५०,०००/—रू चा माल** चोरून झाडाझुडुपी मध्ये डम केल्याचे फिर्यादीला पेट्रोलिंग करतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रविकांत रामदास कन्डे वय ४३ वर्ष रा चनकापुर खापरखेडा यांचे रिपोर्टवरून पोस्टे कन्हान येथे आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोहवा पाल मो क्र ९५५२५१७२६८ हे करीत आहेत.

## आत्महत्येस प्रवृत्त करणारा आरोपी अटकेत

**पोलीस स्टेशन नरखेड** :— अंतर्गत मोवाड १० किमी पश्चीम, यातील मृतक नामे — ज्योती अखिलेश कुशवाह वय २७ वर्ष ही आरोपीची पत्नी असुन आरोपी हा दिनांक ०१.०३.२१ ते दि १८.०८.२२ च्या दरम्यान, मृतक ला घरगुती कामकाजावरून तसेच तिचे चारीत्रावर संशय घेवुन मारझोड करून शारीरीक व मानसिक त्रास देत होता. दिनांक १७.०४.२०२२ रोजी मोबाईलचे कारणावरून भांडण करून मृतक ला मारझोड केली होती. त्याच त्रासाला कंटाळुन मृतकला मरणास प्रवृत्त केल्याने मृतकने दिनांक १८.०४.२०२२ रोजी गळफास लावुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे अजित रामआसरे कुशवाह वय २३ वर्ष रा ग्राम मक्कापुरावा पोस्टे बीरामी तह बिल्लोर जि कानपुर उत्तर प्रदेश, यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी नामे— अखिलेश सुरेंद्र कुशवाह वय २५ वर्ष रा मतौली तह कन्नौज उत्तरपद्रेश, ह मु मोवाड तह नरखेड यांचे विरूध्द कलम ३०६,४९८,(अ) भादवि अन्वयें गुन्हा दाखल असुन नमुद आरोपीस अटक करण्यात आली आहे, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जयपालसिंग गिरासे मो क ८४१९९४११८८ पोस्टे नरखेड करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** अंतर्गत मौजा गुमथळा शिवारातील पाटनकरचे शेताजवळ १२ किमी दक्षिण. यातील ट्रक क्र एम एच ४०—३२७६ चा चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मोटर साकयल क्र एम एच ४० एएन ७५७८ चा चालक **मृतक नामे— विठ्ठल चिंतामन पंचभाई वय २८ वर्ष रा गुमथळा यास समोरून जबर धडक मारल्याने मोटर सायकल चालकाचे हाताला मार लागुन जखमी झाले होते. त्यास ग्रामीण रूगणालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिलीप हीरामन प्रधान वय ४५ वर्ष रा वार्ड क्र आष्टीकला यांचे रिपोर्टवरून आरोपीविरूध्द पो स्टे कळमेश्वर येथे कलम २७९,३०४(अ) भादवि चा गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री मेश्राम मो क्र ९०७५२४५०५९ करीत आहेत.

## मोटर सायकल अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन मौदा:—** अंतर्गत एमएच ५३ रोड वडोदा शिवार १२ किमी पश्चीम. यातील मोटर सायकल क्र एम एच ३१ डिआर ३०५३ ने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगान व निष्काळजीपणाने चालवुन मोटर सायकल क्र एम एच ४९ एम ०५४७ ला कट मारली असता गाडी खाली पडली. व गाडीवर बसलेली फिर्यादीची पत्नी खाली पडली. व तिच्या डोक्याला मार लागुन जखमी झाली.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पो हवा प्रशांत काळे पोस्टे मौदा यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे— मिथीलेश कुमार रा माथनी ता मौदा यांचेविरूध्द पो स्टे मौदा येथे कलम २७९,३३७, भादवि १८४ मोटर वाहन कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा देविदास पवार पोस्टे मौदा मो क्र ९८२३०३७२७९ करीत आहेत.

## विहीरीत पडुन मृत्यु

**पोलीस स्टेशन नरखेड :—** अंतर्गत, यातील मृतक महीला ही दिनांक १७.०४.२२ रोजी घरासमोरील शेत शिवारातील विहीरीवर पाणी भरण्याकरीता गेली असता घरी परत न आल्याने तिचा शोध घेतला मिळुन आली नाही. दिनांक १९.०४.२२ रोजी सकाळी ०८.०० वा दरम्यान मोहल्यातील महीला शेतशिवारातील विहीरीत पाणी भरण्याकरीता गेल्या असता त्यांना विहीरीमध्ये एक स्त्री जातीचे प्रेत तरंगतांना दिसुन आले. फिर्यादी यांनी विहीरीजवळ जावुन पाहीले असता सदर महीला ही फिर्यादीची आई असल्याचे सांगितले. मृतक ही दिनांक १७.०४.२२ रोजी रात्री ११.०० वा सुमारास दारू पिवुन दारूचे नशेत विहीरीवर पाणी काढायला गेली असता तिचा अचानक तोल गेल्याने विहीरीच्या पाण्यात बुडुन मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी याचे रिपोर्टवरून पो स्टे नरखेड येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास सफौ शैलेश डोंगरदिवे पोस्टे नरखेड करीत आहेत.

## गळफास लावुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :– अंतर्गत, चिचोली वार्ड क्र १ खापरखेडा, दिनांक १७.०४.२०२२ ते १९.०४.२२ दरम्यान, **यातील मृतक नामे– धिरज शालीकरामजी बोरकर वय ५५ वर्ष रा चिचोली वार्ड क्र १ खापरखेडा** हीने आपले राहते घरी घरगुती कारणांमुळे बल्लीला लागलेली पाळण्याची रस्सी ने गळफास घेतला. उपचाराकरीता सरकारी दवाखाना चिचोली खापरखेडा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन उपचारापुर्वी दिनांक १८.०४.२०२२ चे १५.०० वा मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी याचे रिपोर्टवरून पो स्टे खापरखेडा येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास पोहवा दाभाडे मो क्र ९७३०८४९७१५ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**